॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

*** सुविचार ***

जीवनातील खरी सुख-शांती अहंकारमुक्त जीवनात आहे.




अहिल्यानगर ■ शनिवार, दि. ७ जून २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक ५३ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ■ 9420802145 ■ www.veerbhuminews.com

## SPOT NEWS

### हाके-मिटकरींमध्ये जुंपली; एकमेकांची काढली औकात

● **पुणे** – अर्थ खात्याचे अर्थमंत्री, अजित पवार यांना अर्थखात्यातले काय समजते? अजित पवार हे काय सीए आहेत काय? असा सवाल करत लक्ष्मण हाकेंनी अजित पवार यांच्यावर टीकास्त्र डागले होते. त्यानंतर आज मिटकरी आणि हाके यांच्यात जुंपली. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरून लक्ष्मण हाके आणि अमोल मिटकरी यांच्यात चांगलीच जुंपली आहे. झालेल्या संवादावेळी लक्ष्मण हाके आणि अमोल मिटकरी यांच्यात शाब्दिक वाद झाले होते. या सगळ्यावर प्रतिक्रिया देताना अजित पवार म्हणाले, लक्ष्मण हाके आणि अमोल मिटकरी यांच्यात झालेला संवाद मला आवडलेला नाही. बोलताना प्रत्येकाला तारतम्य असले पाहिजे. अमोल मिटकरी आणि लक्ष्मण हाके यांच्यावर वाद झाले. यावेळी त्यांच्या बोलण्यातील भाषेचा स्तर घसरला. डुक्करतोंड्या माकडतोंड्या औकात काय? अशा शब्दांचा वापर करून लक्ष्मण हाके आणि अमोल मिटकरी यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाल्याचे पाहायला मिळाले.

### रेपो दरात ०.५० टक्क्यांची कपात

● **मुंबई** – रिझर्व्ह बँकेने बँकांना देत असलेल्या कर्जावरील म्हणजेच रेपो दरात ०.५० टक्क्यांची कपात केली आहे. यामुळे हा रेपो रेट ५.५० टक्के झाला आहे. म्हणजेच बँकांना आरबीआयला कमी दराने व्याज द्यावे लागणार आहे. याचाच फायदा ग्राहकांनाही होणार आहे. जर तुम्ही नवीन व्याजदराने बँकेकडून कर्ज घेतले किंवा व्याजदर कपात करायला लावली तर तुम्ही व्याजावर खूप पैसे वाचवू शकणार आहात. उदा. तुम्ही २० लाखांचे कर्ज २० वर्षांसाठी घेतले असेल तर तुम्ही व्याजापोटी द्यावे लागणार असलेले १.४८ लाख रुपये वाचवू शकणार आहात. हे १.४८ लाख रुपये तुम्ही दुसरीकडे कुठेतरी वापरून त्यातूनही पैसे वाचवू किंवा कमवू शकता. कुठेतरी गुंतविले तर तुम्हाला ७ ते ८ टक्के व्याज मिळू शकते. परंतू, त्याहून अधिक फायदा हवा असेल तर तुम्ही तुमच्यासाठी ईलेक्ट्रीक स्कूटर, बाईक घेऊ शकता.

### राज्यात अतिवृष्टीचा धोका

● **मुंबई** – हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, कालपासून म्हणजे ५ जूनपासून पाऊस पुन्हा सक्रिय झाला असून सध्या काही भागात पाऊस पडत आहे, तर काही भागात पावसाने उगडीप दिली आहे. गेल्या काही दिवसात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आहे. नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत. धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ होत आहे. दरम्यान, अशातच राज्यातील २६ जिल्हांना यलो अलर्ट जारी करण्यात आल्याची माहिती हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी दिली आहे. आज वादळी वारे, विजा आणि मध्यम पर्जन्याची शक्यता आहे. पंजाबराव डख यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यात ७ ते १० जूनच्या दरम्यान भाग बदलत पाऊस पडणार आहे. शेतक-यांचे १० जून पर्यंत शेत नाही तयार झाले तर १०, ११ आणि १२ जून तीन दिवस शेत तयार करायला पुन्हा चान्स मिळेल. राज्यात १३ ते १८ जून मुसळधार पाऊस पडणार आहे. ठिकठिकाणी ओढे नाले वाहतील असा पाऊस पडणार आहे.

# मुख्यमंत्री फडणवीस गडचिरोलीत मुक्कामी

## गडचिरोलीमधून माओवाद संपुष्टात आणू : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

● **गडचिरोली । वीरभूमी–**

महाराष्ट्रातील नक्षल प्रभावी जिल्हा म्हणून ओळख असलेल्या गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्रीपद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वीकारले आहे. गडचिरोलीत माझ्या एवढा फिरलेला मुख्यमंत्री दुसरा कोणीच नाही, असे म्हणत मुख्यमंत्री फडणवीस यांनी गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलवादी भागात आपण स्वत: शेवटच्या टोकापर्यंत दौरे केल्याचे म्हटले. तसेच, लवकरच गडचिरोलीमधून माओवाद संपुष्टात आणू असा दावाही त्यांनी केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज गडचिरोलीत १३ आत्मसमर्पित नक्षलवादी युवक-युवतींचा सामूदायिक विवाहसोहळा संपन्न होत आहे. स्वत: देवेंद्र फडणवीस हे नवजोडप्यांना आशीर्वाद देण्यासाठी लग्नसोहळ्याला उपस्थित राहत आहेत. तत्पूर्वी त्यांनी गडचिरोली जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर जाऊन पाहणी केली. आपण महाराष्ट्राच्या पहिल्या पॉईंटवर आलो आहोत, अगदी आपल्या नजरेत दिसेल एवढ्याजवळ छत्तीसगड आहे. कवंडेच्या पोलिस आऊटपोस्टमुळे या भागातील सिक्युरिटीचा खूप मोठा बॅकलॉग भरून निघाला आहे.



हा भाग आजवर सर्व प्रकाराने अनकनेक्टेड होता. मात्र, आता पोलिस इथे आल्यानंतर शासनाच्या सर्व योजना, त्यांचे लाभ लोकांना मिळतील. शासनावरील लोकांचा विश्वास वाढेल आणि संपूर्ण भाग पोलिसांच्या आणि शासनाच्या डॉमिनन्स खाली आला आहे. आता माओवाद्यांना इथे कुठलेही ऑपरेशन्स राबवता येणार नाही, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

माझ्या एवढे गडचिरोलीत फिरणारा दुसरा मुख्यमंत्री महाराष्ट्रात कोणीही नाही, या ठिकाणी विपरीत परिस्थितीत आपले सिक्युरिटी फॉर्सेस चांगलं काम करत आहेत. या सुरक्षा यंत्रणांचा मनोबल वाढवे म्हणून मी अशा आऊटपोस्टवर दुर्गम भागात जात असतो. लवकरच गडचिरोलीमधून माओवाद पूर्णपणे संपुष्टात आणू असा विश्वासही त्यांनी यावेळी बोलून दाखवला. आजवर गडचिरोलीचा विकास आणि विकासाची क्षमता नेत्यांच्या भाषणामध्ये असायची. मात्र, २०१४ नंतर आम्ही प्रत्यक्ष आणि गडचिरोलीत बदल घडवून आणले. मात्र, गडचिरोलीत औद्योगिक विकास करत असताना इथले जल, जंगल आणि जमीन वाचवून आपल्याला विकास करायचा आहे. गडचिरोलीचा नैसर्गिक स्वभाव आपण बदलणार नाही, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी स्पष्ट केले.

### आत्मसमर्पित नक्षलवाद्यांचा लग्नसोहळा

■ गडचिरोली पोलिस दलातर्फे आत्मसमर्पित नक्षलवादी युवक युवतींचा सामूहिक विवाह सोहळा आयोजित केला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा आगळावेगळा लग्नसोहळा संपन्न होत आहे. जवळपास १३ आत्मसमर्पित नक्षल युवक युवती या विवाह सोहळ्यातून लग्न बंधनात अडकणार आहेत. तत्पूर्वी गडचिरोली पोलिस दलाच्या बँड पथकाद्वारे पोलिस मुख्यालय परिसरातून वर-वधुंची वाजत जागत वरात काढण्यात आली. या वरातीत पोलिस कर्मचारी वऱ्हाडी बनवून सहभागी झाले होते. विवाह बंधनात अडकणाऱ्या मोस्ट वॉन्टेड नक्षली गिरीधरसह नक्षल युवक-युवतींनी या लग्न सोहळ्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

# दोन्ही राष्ट्रवादी विलिनीकरणाचा प्रस्ताव नाही

## प्रदेशाध्यक्ष तटकरे यांची माहिती



● **पुणे । वीरभूमी–**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली एनडीएमध्ये सहभागी होण्याचा व राज्यात महायुतीत सहभागी होण्याचा निर्णय घेतला, या निर्णयापासून दूर जाण्याचा प्रश्न नाही. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाबाबत कोणताच प्रस्ताव आलेला नाही. असे राष्ट्रवादी काँग्रेसचे(अजित पवार गट) प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी पत्रकारांना सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या २६ व्या वर्धापन दिनानिमित्त येत्या १० जूनला बालेवाडी येथे पक्षाचा राज्यस्तरीय मेळावा आयोजित करण्यात आला आहे असे नमूद करून ते म्हणाले, पुढील काही महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होतील. या निवडणुकांना महायुती म्हणून तिन्ही पक्ष सामोरे जाऊ, प्रत्येक महापालिकेतील राजकीय परिस्थिती वेगळी आहे. महायुतीतील तिन्ही पक्षांची समन्वय समिती आहे. महापालिकानिहाय चर्चा करून निवडणुकीला स्वतंत्रपणे कुठे सामोरे जायचे याबाबत मार्ग काढू. या निर्णयातून महायुतीच्या ऐक्याला तडा जाणार नाही याची खबरदारी नक्की घेतली जाणार आहे.

पक्षाच्या २६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय मेळाव्याला राज्यातील कार्यकर्ते पदाधिकारी व पक्षाचे सर्व आमदार उपस्थित राहणार आहेत. मेळाव्यात आगामी वर्षातील नवीन आव्हाने कार्यकर्त्यांच्या अपेक्षा व महाराष्ट्रातील जनतेच्या पक्षाकडून असलेल्या अपेक्षा याबाबत उहापोह होणार आहे असे ते म्हणाले.

# जगातील सर्वांत उंच रेल्वे पुलावर फडकला तिरंगा

## चिनाब पुलाचे मोदींच्या हस्ते लोकार्पण । २२ वर्षांनंतर स्वप्न साकार

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**

जम्मू-काश्मीरमधील जगातील सर्वांत उंच रेल्वे पूल असलेल्या चिनाब पुलाचे आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. हा रेल्वे पूल जम्मू-काश्मीरच्या विकासातील एक क्षण मानला जात आहे. चिनाब नदीवर या पुलाचे बांधकाम करणे खूप अवघड होते. मात्र, हे आव्हान पूर्ण करीत अभियंत्यांनी चिनाब पुलाचे काम यशस्वीरित्या पूर्ण केले. तसेच काही महिन्यांपूर्वी या पुलावरून रेल्वेची पहिली यशस्वी चाचणीही पार पडली. आज या पुलाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या पुलाचे लोकार्पण करण्यात आले.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शुक्रवारी २७२ किमी लांबीच्या उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंकमधील सर्वांत महत्त्वाचा टप्पा मानल्या जाणाऱ्या चिनाब रेल्वे पुलाचे उद्घाटन केले. साधारण १३१५ मीटर लांबीचा हा पूल संपूर्ण प्रकल्पातील सर्वांत कठीण आणि वेळखाऊ भाग होता. या पुलाच्या उद्घाटनानंतर जम्मू काश्मीरच्या इतिहासात एक नवा अध्याय जोडला गेला आणि फार मोठे स्वप्न साकार झाले. चिनाब पूल प्रकल्प पंतप्रधान मोदी यांच्या सरकारच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक मानला जात होता. या चिनाब पुलाला रेल्वे क्षेत्रातील नाविन्यपूर्ण प्रकल्प म्हणून ओळखले जाते. अभियांत्रिकी चमत्कार मानला जाणारा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प जम्मू-काश्मीरच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. चिनाब पुलाच्या दोन्ही बाजूंना झिंकने कोट केले आहे. या बहुचर्चित पुलावरून उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लाईन सुरू होणार आहे.

चिनाब पूल १,१७८ फूट उंचीवर आहे. तसेच आयफेल टॉवरपेक्षा ३५ मीटर उंच असून, या पुलाचे आयुष्य १२० वर्षे इतके आहे. जगातील सर्वांत उंच चिनाब पुलाच्या उद्घाटनापूर्वी स्थिरता आणि सुरक्षितता तपासण्यासाठी अनेक चाचण्यादेखील करण्यात आल्या. २६० कि.मी. प्रतितास वेगाच्या वाऱ्यांना आणि अतिजास्त तापमान व भूकंपासह इतर समस्यांना तोंड देण्यास हा पूल सक्षम आहे.

२००३ मध्ये चिनाब पुलाच्या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली होती. २००५ मध्ये पुलाचे बांधकाम सुरू झाले. २००९ मध्ये पुलाचे बांधकाम पूर्ण करायचे होते. परंतु ते झाले नाही तर २०१७ साली ३२०० कामगार आणि अभियंते यासाठी कामाला लागले. काम थांबू नये, म्हणून ५२ निवासी ब्लॉकमध्ये त्यांच्या राहण्याची व्यवस्था करण्यात आली. २०२१ मध्ये पुलाच्या कमानी बांधण्याचे काम सुरू झाले. पुलावर ट्रॅक टाकण्याचे कामही सुरू झाले. २०२४ ला गाड्यांची चाचणी पूर्ण झाली. चाचणी आणि तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली. २०२५ ला मंजुरीच्या २२ वर्षांनंतर ६ जून रोजी पुलाचे उद्घाटन करण्यात आले.

काश्मीर खोऱ्यात चिनाब नदीवर बांधलेला हा पूल अभियांत्रिकीचे एक अतुलनीय आणि बदलत्या भारताचे



उदाहरण आहे, जो पॅरिसमधील आयफेल टॉवरपेक्षाही उंच आहे. हा पूल ४० किलो स्फोटके आणि ८ रिश्टर स्केलपर्यंतच्या भूकंपाचा सामना करू शकतो.

जम्मू-काश्मीरच्या लोकांसाठी चिनाब पूल वरदान ठरणार आहे. या पुलामुळे या प्रदेशात पुढे तयार होणाऱ्या प्रकल्पांसाठी प्रवास आणि मालाची वाहतूक सुलभ होईल. तसेच या प्रदेशात तैनात सशस्त्र दलासाठी रेल्वे मार्ग अधिक उपयुक्त ठरेल. तसेच पर्यटनाला चालना देण्यासही मदत होणार असल्याचे सांगण्यात आले.

काश्मीरला देशाच्या इतर भागाशी जोडणारी पहिली वंदे भारत एक्स्प्रेस आज (६ जून) कटरा स्टेशनवरून धावली. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते कटरा येथे या ट्रेनला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. जगातील सर्वात उंच रेल्वे आर्च ब्रिजवर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी तिरंगा फडकावत आनंद व्यक्त केला. चिनाब ब्रिज आणि देशातील पहिला केबल-स्टेड रेल्वे ब्रिज अंजी ब्रिजला भेट देत मोदींच्या हस्ते या ब्रीजचे लोकार्पण करण्यात आले.


# महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन संघर्ष समितीची निदर्शने

## भन्ते विनयाचार्य यांना झालेली अटक व बिहारचे राज्यपालांनी धार्मिक भावना दुखावल्याचा निषेध

● **नगर । वीरभूमी–**

बिहार मधील बिहार मधील महाबौध्दि बुद्धविहारचे नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन संघर्ष समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालया समोर निदर्शने करण्यात आली. तसेच महाबौध्दि बुद्धविहारच्या मुक्तीसाठी सुरु असलेले आंदोलन दडपण्यासाठी सुरु असलेले कटकारस्थान, भन्ते विनयाचार्य यांना झालेली अटक व बिहारचे राज्यपाल यांच्या माध्यमातून बौध्द समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्याचा निषेध करण्यात आला.

टिळक रोड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक मधील भगवान गौतम बुद्ध व माळीवाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाने जावून जोरदार निदर्शने करण्यात आली. बोधगया महाविहार कायदा १९४९ चा अन्यायकारक कायदा रद्द करण्यासाठी समाजबांधवांनी जोरदार घोषणाबाजी केली. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सदर मागण्यांचे निवेदन राष्ट्रपती यांना पाठविण्यात



आले. निवासी उपजिल्हाधिकारी प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी अरुण उंडे यांनी शिष्टमंडळाचे निवेदन स्विकारले.

संपूर्ण देशभरात १२ फेब्रुवारी पासून महाबौध्दि बुद्धविहारचे नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी आंदोलन सुरु आहे. बिहार सरकार व केंद्र सरकार याकडे दुर्लक्ष करत आहे. जाणीवपूर्वक आरएसएस व भाजपने बिहार येथील राज्यपाल यांना महाबौध्दि बुद्धविहारात पाठवून शिवलिंगची पूजा करवून घेतली. यापूर्वी देखील त्यांनी महाबोधी महाविहारला शिवालय संबोधित करून देशातील बौध्द समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या. बिहारचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान मुस्लिम असून वैदिक मंत्र उच्चारात त्यांच्याकडून पूजा करविण्यात आली आहे. राज्यपालांनी आंतरराष्ट्रीय धरोवर असलेल्या महाबोधी महाविहारचा अपमान केला असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

बीटीएमसी बौद्ध धरोवर नष्ट करण्यासाठी बनवण्यात आले आहे. बीटी क्ट रद्द करण्याची मागणी यावेळी समाजबांधवांनी केली.बिहार तथा केंद्र सरकार भारतातील बौद्ध समाजाला उकसवण्याचे काम करत आहे. १३ मे रोजी बिहार येथे महाबौध्दि बुद्धविहारच्या मुक्तीसाठी शांततेने सुरु असलेल्या आंदोलनात काही जातीयवादी गुंडांनी धुडगुस घातला. बिहार पोलिसांनी ही परिस्थिती आटोक्यात आणण्याऐवजी भन्ते विनयाचार्य यांच्यासह त्यांच्या साथीदारांना अटक केली. यामुळे सर्व समाज बांधवांच्या भावना तीव्र असून, तात्काळ बीटी क्ट रद्द करुन बिहार मधील महाबौध्दि बुद्धविहारचे नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात देण्याची मागणी महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

# लवकरच जनतेच्या मनातले होणार : उद्धव ठाकरे

● **मुंबई । वीरभूमी–**

मनसे आणि ठाकरे गटाच्या युतीबाबत सध्या जोरदार चर्चा रंगली आहे. राज्यातील अनेक ठिकाणचे कार्यकर्ते एकमेकांना भेटत आहेत. कार्यकर्त्यांचे मनोमिलन सुरू झाले असून नेत्यांचे मनोमिलन कधी होणार, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. याच दरम्यान उद्धव ठाकरे यांनी मोठे विधान केले आहे. जे महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात आहे ते होईल, लवकरच बातमी देईन असे म्हटले.

शिंदे गटाच्या सुजाता शिंगाडे यांनी आज ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. याच दरम्यान उद्धव ठाकरे यांनी संवाद साधत 'मनसे'सोबतच्या युतीवर भाष्य केले आहे. जे महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात आहे ते होईल. त्याबद्दलचे बाकीचे जे काही बारकावे आहेत ते आमचे आम्ही बघत आहोत. शिवसैनिकांच्या मनात कुठेच संभ्रम नाही. त्यांचे जे सैनिक संपर्कात आहेत, त्यांच्याही मनात संभ्रम नाही. संदेश देण्यापेक्षा लवकरच जी काही बातमी द्यायची आहे ती देऊ असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी देखील याबाबत महत्त्वाचे विधान केले आहे. नेत्यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याने कार्यकर्त्यांचे मनोमिलन सुरू आहे. राज ठाकरे यांचे सहकारी आणि उद्धव ठाकरे यांचे सहकारी या विषयावर अत्यंत सकारात्मक आहेत. त्याचाच परिणाम जमिनीवर कार्यकर्त्यांचे मनोमिलन झाले असेल. त्यात चिंता करण्यासारखे काय आहे, उलट या गोष्टीचे स्वागत करायला हवे असे राऊत यांनी म्हटले आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे सुपुत्र अमित ठाकरेंनी मनसे आणि ठाकरेंच्या शिवसेना युतीवरही भाष्य केलं आहे. दोन भावांनी बोलले पाहिजे. त्यांच्याकडे एकमेकांचे नंबर आहेत, ते बोलू शकतात अशी प्रतिक्रिया दिली होती. माझी भूमिका एवढीच आहे की, दोन भावांनी बोलले पाहिजे. आम्ही बोलून काही फरक पडणार नाही. दोन भाऊ एकत्र येण्यात मला काही इश्यू नाही. मी २०१४, २०१७ ला बघितले आहे, कोरोना काळातही पाहिले, कोरोनात उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते तेव्हा राज साहेबांनी उद्धवजींना पहिला फोन केला होता.

SPOT NEWS



## सेवापूर्ती निमित्त उपकार्यकारी अभियंता कुंडलिक शेळके यांचा सन्मान

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

सार्वजनिक बांधकाम विभागातील उपकार्यकारी अभियंता कुंडलिक शेळके यांच्या सेवापूर्तीनिमित्त त्यांच्या उल्लेखनीय सेवेचा गौरव करण्यात आला. सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता उत्तम बोरुडे आणि उपविभागाचे उपअभियंता शशी सुतार यांनी शेळके दांपत्याचा सत्कार केला. या सेवापूर्तीच्या कार्यक्रमास सेवानिवृत्त उपअभियंता प्रकाश तीपुळे, शाखा अभियंता सतीश शिंदे तसेच विभागातील इतर अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्तम बोरुडे यांनी शेळके यांची प्रशासकीय कार्य, प्रामाणिकपणा, बांधकामातील काटेकोर अंमलबजावणी व सहकाऱ्यांशी असलेले सौहार्दाचे संबंध याचे विशेष कौतुक केले. तर विभागातील दिलखुलास व्यक्तीमत्व म्हणून ते सर्वांना सुपरिचत असल्याचे स्पष्ट केले. सत्काराला उत्तर देताना कुंडलिक शेळके यांनी सहकाऱ्यांचे व वरिष्ठांनी केलेल्या सहकार्याने चांगले काम करता आले. विभागातील विविध जुन्या आठवणींना त्यांनी उजाळा दिला. पुढे त्यांनी आपल्या भावनिक भाषणात सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यलय व येथील सर्व सहकारी दुसरे कुटुंब झाले होते. या प्रवासात अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. जीवनातील अनेक चढ–उतार, ताणतणाव प्रसंग त्यांनी विशद केले. सर्वांना बरोबर घेऊन काम केले व प्रामाणिकपणे शासनाची सेवा केल्याचे समाधान असल्याचे व्यक्त करताना भावनिक प्रसंगावर बोलताना त्यांचा कंठ दाटून आला. उपस्थितांनी त्यांना पुढील निरोगी व सुखी आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## बाळासाहेब कनगरे यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर नियुक्ती

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**



कर्तव्यदक्षपणे अहिल्यानगर पोलीस दलात कार्यरत असलेले बाळासाहेब कनगरे यांना पोलीस उपनिरीक्षक पदावर बढती मिळाली आहे. कनगरे यांनी आपल्या सेवाकाळात विविध ठिकाणी कर्तव्य बजावून सर्वसामान्यांचे रक्षण करुन गुन्हेगारीवर वचक निर्माण केला. प्रामाणिक व कर्तव्यदक्षपणे त्यांनी केलेल्या सेवेची दखल घेऊन त्यांची बढती करण्यात आली आहे. कनगरे यांनी पोलीस हवालदार पदापासून आपल्या कार्याला सुरुवात केली. अनेक कठीण प्रसंगांना सामोरे जावून त्यांनी कर्तव्य उत्तमपणे बजावले. बाळासाहेब कनगरे यांनी ही संधी म्हणजे कर्तव्यनिष्ठेचा सन्मान असून, वरिष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनामुळे आणि कुटुंबाच्या पाठिंब्यामुळे शक्य झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. त्यांच्या बढतीबद्दल पोलीस दलातील अधिकारी, सहकारी आणि सामाजिक कार्यकर्ते प्रकाश थोरात, अरुण जगताप यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## अमृतेश्वर मंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

येथील अर्बन बँक चौकातील पुरातन अमृतेश्वर महादेव देवस्थान मंदिरात विविध देव–देवतांच्या मूर्तींची बुधवारी प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यानिमित्त महापूजा, होम हवन, मिरवणूक, महाआरती, प्रसाद आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अहिल्यानगरचे धर्मादाय उपायुक्त नवनाथ जगताप यांच्या हस्ते महाआरती झाली. अमृतेश्वर मंदिर हे पुरातन मंदिर आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांनी हे मंदिर स्थापन केल्याचे उल्लेख इतिहासात आढळतात. १९५२ मध्ये या मंदिर देवस्थान ट्रस्टची स्थापना झाली. या मंदिरात गणपती, मारुती, पार्वती, विठ्ठल–रुख्मिणी, दत्तात्रेयांच्या मूर्तींची वेद मंत्रांच्या जयघोषात स्थापना करण्यात आली. आशुतोष रेखी यांनी या सोहळ्याचे पौराहित्य केले. डॉ. दर्शन करमाळकर, पंकज पांड्या, राजेंद्र जोशी, पेठकर, यशवंत नवले, कुलकर्णी, गोपी कुलकर्णी, योगेश सुपेकर, सचिन पेठकर आदींसह ११ दाम्पत्यांना महापुजेचा मान देण्यात आला होता. यावेळी जगताप यांचा देवस्थान विश्वस्त मंडळाने सत्कार केला. यावेळी विश्वस्त नंदिनी जोशी, सतीश सुपेकर, रवींद्र शित्रे, सुनील शिंदे, देवस्थानचे कायदेशीर सल्लागार अँड. गौरव मिरीकर आदींची उपस्थिती होती.

# काजवा महोत्सवाला होवू लागली पर्यटकांची गर्दी

### काजवा महोत्सवाकडे पोलिस प्रशासनाचे दुर्लक्ष । पर्यटकांकडून नाराजी व्यक्त

**● अकोले । वीरभूमी –**

काजव्यांची मायानगरी म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या भंडारदराच्या कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यात काजव्यांना बहर आला असून हजारो पर्यटक काजव्यांच्या चकाकण्याचा करिष्मा बघण्यासाठी आभारण्यात गर्दी करू लागले आहेत.

अकोले तालुक्यातील भंडारदरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये असणारे कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य म्हणजे काजव्यांचे माहेरघर समजले जाते. याच माहेरघरात मे महिन्याच्या शेवटच्या पंधरवड्यात आणि जून महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात कोट्यावधींच्या स्वरूपात अनेक झाडे काजव्यांनी लगडलेली दिसुन येतात. काजव्यांचा हा प्रजनन काळा असुन नर मादीला आकर्षित करण्यासाठी चमकत असतो. काजव्यांचा हा चमकण्याचा करिष्मा बघण्यासाठी हजारो पर्यटक भंडारदऱ्याला आवर्जून भेट देत असतात.



ग्रीष्म ऋतू संपतो न संपतोय तोच वर्षा राणीच्या स्वागतासाठी निसर्ग देवताच जणू काजव्यांच्या रूपात धरतीवर अवतरलीय की काय? असा विचार मनात चमकून जातो. गगनातील तारांगणच जणू भुईवर उतरलंय... इथे रात्रच चांदण्यांची झालीय असा आभास, काजव्यांची मायावी दुनिया निर्माण करते. काजव्यांच्या अस्तित्वाने रात्रीच्या प्रकाशाचा अदभूत खेळ तासनतास पाहत बसलो तरी मन काही त्रुप्त होत नाही. असा हा काजव्यांचा अमाप महीमा असुन काजव्यांचा हा अविस्मरणीय सोहळा पाहण्यासाठी पर्यटकांची झुंबड अभयारण्यात पाहायला मिळते आहे. यावर्षी भंडारदऱ्याला लवकरच काजव्यांची चाहूल लागली. मात्र अवकाळी पावसाने या काजव्यांवरच गदा आणली. काही काळ पावसामध्ये काजवे कुठे गायब झाले हे समजायला मार्ग नव्हता. भंडारदऱ्याला खास काजवे बघण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या पदरी निराशा पडली होती. मात्र दोन दिवसापूर्वी भंडारदऱ्यांचे वातावरण कोरडे झाले आणि पुन्हा एकदा काजव्यांची चकाकी भंडारदऱ्याच्या कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यात हिरडा, सादडा, बेहडा, आंबा, जांभुळ या झाडावर बघावयास मिळू लागला. कोट्यावधीच्या स्वरूपाने काजवे या झाडांवर चमकताना दिसून येत आहेत.

भंडारदऱ्याला काजवे बघण्यासाठी होणारी पर्यटकांची गर्दी बघता वनविभाग मात्र सतर्क झाले असून काजवे बघण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना त्यांच्याकडून काजव्यांना कोणतेही गालबोट लागणार नाही याची काळजी घेत काजवे बघण्यासाठी अभयारण्यात सोडत आहेत. प्रत्येक वाहनाची काळजीने तपासणी टोल नाक्यावर होताना दिसून येत आहे. अभयारण्यामध्ये गाड्यांच्या प्रकाशाचा काजव्यांवर परिणाम होणार नाही याचीही दक्षता घेण्याचा प्रयत्न वन्यजीव विभागाने केलेला दिसतोय. ठिकठिकाणी वाहनतळ उभारण्यात आले असून या ठिकाणावरूनच काजवे बघण्यासाठी पर्यटकांना पायी प्रवास करावा लागतोय. थोडक्यातच यावर्षी अभयारण्य अलर्ट मोडवर आलेले दिसून येते.

भंडारदऱ्याला असंख्य पर्यटक काजवा बघण्यासाठी येण्याच्या निमित्ताने गर्दी करत असतानाच पोलीस प्रशासन मात्र या काजव्यांच्या महोत्सवाकडे साफ दुर्लक्ष करताना दिसून येते. फक्त आम्ही आहोत हीच भूमिका राजुरच्या पोलीस प्रशासनाची दिसून येत आहे. भंडारदऱ्यासारख्या पर्यटन स्थळावर पोलिसांची गरज असताना एकही पोलीस भंडारदऱ्याला का फिरकत नाही, हा मोठा प्रश्न पर्यटकांसह सामान्य नागरिकांनाही पडला आहे. एखादी अघटीत घटना जर या कालावधीत भंडारदरा पर्यटन स्थळावर जर घडली तर याला जबाबदार कोण? पोलीस प्रशासन फक्त बघ्याची भूमिका घेत असल्यामुळे भंडारदरा पर्यटन स्थळावर पोलिसांकडून जाणून बुजून दुर्लक्ष केले जाते का? असाही प्रश्न आता काजवा प्रेमींना पडला आहे.

## वृक्ष लागवडीबरोबरच त्याचे संवर्धन करणे गरजेचे

### प्रल्हाद घुले । पर्यावरण दिनानिमित्त वसंतराव नाईक वाचनालयाच्यावतीने वृक्षारोपण

**● पाथर्डी । वीरभूमी–**

वृक्ष हे आपल्याला प्राणवायु सह फळ, फुले आणि सावली देतात. म्हणून वृक्ष लागवड करणेच महत्त्वाचे नाहीतर त्या वृक्षाचे जतन आणि संवर्धन करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन सेवानिवृत मुख्याध्यापक प्रल्हाद घुले यांनी केले.



जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्त साधून वसंतराव नाईक वाचन मंदिराच्या वतीने शहरातील आनंदनगर येथील श्री जगदंबा देवी, संत सेवादास महाराज मंदिराच्या प्रांगणात ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना घुले बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक नामदेव कीर्तने गुरुजी तर प्रमुख पाहुणे म्हणून कवी एकनाथ चन्ने गुरुजी, उद्योजक दत्तूशेठ चव्हाण, संस्थेचे अध्यक्ष, माजी पंचायत समिती सदस्य विष्णुपंत पवार, उद्योजक सुरेशशेठ चव्हाण, सारंगधर जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना कीर्तने गुरुजी यांनी पर्यावरणाचा ऱ्हास टाळण्यासाठी प्लास्टिक मुक्तीची संकल्पना मांडली. नागरिकांनी प्लास्टिक न वापरण्याची शपथ घेतली पाहिजे असे आवाहन केले.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन सचिन चव्हाण यांनी केले तर विलास पवार आभार यांनी मानले.

## अकोले तालुका माहेश्वरी सभेच्यावतीने महेश नवमी उत्साहात साजरी

**● अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुका माहेश्वरी सभेच्या वतीने महेश नवमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महेश नवमी निमित्त भगवान महेश यांची सुशोभित रथातून शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत अबाल वृद्धांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सर्वांच्या वेशभूषेने अकोलेकरांचे लक्ष वेधून घेतले. शोभायात्रेचा समारोप श्रीराम मंदिरात महेश भगवानच्या आरतीने झाला.



महेश नवमीनिमित्त रक्तदान शिबिर, क्रिकेट व बुद्धिबळ स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते. त्यास चांगला प्रतिसाद मिळाला. तसेच दिवसभरात संपन्न झालेल्या विविध स्पर्धासह शैक्षणिक गुणवत्तेतील विद्यार्थ्यांचा व विशेष प्राविण्य मिळविलेल्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सर्व कार्यक्रमाचे नियोजन तालुकाध्यक्ष विजय सारडा, सचिव विशाल राठी यांनी केले. तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तालुका सभेचे उपाध्यक्ष चेतन बुब, खजिनदार प्रसाद राठी, सह–सचिव आनंद मुंदडा, संघटन मंत्री नीरज मुंदडा यांनी विशेष परिश्रम घेतले.

महेश भगवानच्या शोभायात्रेत अध्यक्ष विजय सारडा, सचिव विशाल राठी, जिल्हा उपाध्यक्ष सोमनाथ मुंदडा, रामनिवास राठी, रमेश सारडा, सतीश बुब, समीर जाजू, सुरेश करवा, योगेश मुंदडा, महिला मंडळ अध्यक्ष सौ.प्रियंका बुब, सचिव सौ. तृप्ती सारडा तसेच समाज बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रक्तदानामध्ये तरुण व स्वयंसेवी संस्थांची भुमिका महत्वाची

### पो. नि. संतोष मुटकुळे । शिवराज्याभिषेक दिनानिमित्त चैतन्य फौंडेशनच्या वतीने पाथर्डीत रक्तदान शिबीर

**● पाथर्डी । वीरभूमी–**

देशामध्ये वाढत्या रक्ताची गरज हा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असुन त्यासाठी देशातील तरुण व स्वयंसेवी संस्थांची कामगीरी महत्वाची आहे असे मत पोलिस निरिक्षक संतोष मुटकुळे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेक दिनानिमित्ताने चैतन्य फाउंडेशन, पाथर्डी साईसेवा ब्लड सेंटर अहमदनगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराचे उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले. शिबीराचे उद्घाटन डॉ. दिपक देशमुख व डॉ. शरद कचरे यांच्या हस्ते करण्यात आले.

रक्तदान हे एक चांगले सामाजिक कार्य असुन देशामध्ये आज मोठ्याप्रमाणात रक्ताची गरज भासत आहे. ही गरज भरुन काढण्यासाठी देशातील तरुणांनी विशेष पुढाकार घेउन रक्तदान करावे. या कार्यामध्ये सामाजिक संस्थाची भुमिका देखील महत्वाची आहे. त्याच्या पुढाकारातुन वेगवेगळ्या ठिकाणी सामाजिक उत्सवांच्या निमित्ताने रक्तदान शिबीरे आयोजित करुन युवक वर्गामध्ये रक्तदान करुन घेण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. पाथर्डी येथील चैतन्य फौंडेशनच्या वतीने नेहमी विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात व त्यास येथील पाथर्डीकरांचा प्रतिसाद मिळतो. कोरोना तसेच अनेक अतिवृष्टीच्या काळामधील त्यांचे समाजिक कार्याची अनेक संस्थांनी दखल घेतलेली आहे. अशी शाबासकीची थाप पोलिस निरिक्षक संतोष मुटकुळे यांनी टाकली.

यावेळी डॉ. दिपक देशमुख यांनी रक्तदान करण्यासाठीच्या आवश्यक काळजी याविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी आदर्श शिक्षीका ज्योती जेधे, कांचन शिंदे, चैतन्य फाउंडेशन, डॉक्टर व मेडिकल असोसिएशन यांच्यासह अनेक तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रक्तदान केले. यावेळी माजी प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे, डॉ. दिपक देशमुख, डॉ. शरद कचरे, डॉ. अभय आव्हाड, डॉ. जगदीश मुने, डॉ. सुहास उरणकर, डॉ. संदीप बांगर, डॉ. राजेश धाकतोडे, चंद्रकांत घालमे, विजय ढोले, ग्रामविकास अधिकारी राजेंद्र ढाळे, डॉ. शहादेव काळे, अँड. हरिहर गर्जे, भोलेनाथ मर्दाने, अजिंक्य खेडकर, विठ्ठल साप्ते आदी उपस्थित होते.



साईसेवा ब्लड बँकच्या वतीने डॉ. जमुना राउत, डॉ. पियुश मोडवे, डॉ. प्रशांत ठोंबरे, डॉ. पायल वैद्य, डॉ. अजित जगताप यांनी कामकाज केले.

शिबीरामध्ये एकुण १०१ बॅगचे संकलन करण्यात आले. चैतन्य फाउंडेशनचे अध्यक्ष अनंत ढोले यांनी सर्व रक्तदात्यांचे व साईसेवा ब्लड सेंटरचे आभार मानले.

### सस्टेनेबल रिसोर्स मॅनेजमेंट ड्राईव्ह या थीमखाली

# टोयोटा किर्लोस्कर मोटरकडून एन्व्हायर्नमेंट मंथ २०२५ ची सुरुवात

**● पुणे । वीरभूमी–**

टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज एन्व्हायर्नमेंट मंथ २०२५ अर्थात पर्यावरण महिना ची सुरुवात केली असून, सस्टेनेबल रिसोर्स मॅनेजमेंट ड्राईव्ह या थीमच्या माध्यमातून टिकावूपणा (सस्टेनेबिलिटी) या दिशेने आपली वचनबद्धता पुन्हा अधोरेखित केली आहे. हा उपक्रम टोयोटा एन्व्हायर्नमेंटल चॅलेंज २०५० आणि ग्लोबल थीम इन्हानसिंग अवेयरनेस टूवर्ड्स रियलायजिंग टोयोटा ग्लोबल व्हिजन २०५० सोबत सुसंगत आहे. या मोहिमेचा उद्देश कंपनी आणि तिच्या मूल्यसाखळीत (व्हॅल्यू चेन) शाश्वततेची संस्कृती(सस्टेनेबिलिटी कल्चर) अधिक बळकट करणे आहे. यावर्षीचा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'झिरो–बेस थिंकिंग' या धोरणाचा अवलंब – ज्यामध्ये सर्व संसाधनांचे मूल्यमापन नव्याने करून, केवळ खरे मूल्य निर्माण करणारीच संसाधने कायम ठेवली जातात. यामुळे रिफ्युज, रिसायकल (सर्क्युलर इकॉनॉमी), रियूज आणि रिड्यूस (4R) यामार्गे दीर्घकालीन टिकाऊ कार्यक्षमतेला चालना मिळते.

प्रत्येक वर्षी जून महिन्यात साजरा केला जाणारा टोयोटाचा ग्लोबल एन्व्हायर्नमेंट मंथ महत्त्वाच्या पर्यावरणीय समस्यांवर कृती करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करतो. २०२५ मधील आवृत्ती ही जनजागृती आणि सहभाग वाढवण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांवर आधारित आहे, शिवाय भारतात टीकेएमच्या २५ वर्षांच्या यशस्वी प्रवासाचा टप्पाही साजरा केला जात आहे. यंदाचा थीम आहे – 'जर्नी टू ग्रीन २५' जी त्यांच्या प्रमुख पर्यावरणीय कामगिरीचे प्रतिनिधित्व करते.

### या प्रवासातील काही महत्त्वाचे पर्यावरणीय टप्पे खालीलप्रमाणे

■ उत्पादनासाठी लागणाऱ्या एकूण पाण्याच्या गरजेपैकी ८९.३% गरज पुनर्वापरित पाणी आणि पावसाचे पाणी साठवून भागवली जाते.

■ उत्पादन प्रक्रियेतून शून्य कार्बन उत्सर्जन साध्य करण्याच्या दिशेने वाटचाल करत, ग्रीड वीजेसाठी १००% नूतनीकरणीय ऊर्जेचा वापर केला जातो.

■ प्लांटमधील कचऱ्याच्या पुनर्वापरक्षमतेत ९६% सुधारणा करत, प्रभावी कचरा व्यवस्थापन प्रणालीचा अवलंब.

■ टीकेएमने २५ एकर जागेत १७ शैक्षणिक थीम पार्क्ससह 'इकोझोन' स्थापन केला आहे – जो एक अनुभवात्मक पर्यावरण शिक्षण केंद्र आहे. हे केंद्र मुख्यतः मुलांमध्ये पर्यावरण जागरूकता निर्माण करण्यासाठी विकसित केले गेले आहे. आतापर्यंत ४२,००० पेक्षा अधिक विद्यार्थी आणि इतर सहभागींपर्यंत याची पोहोच झाली आहे.

या प्रसंगी टीकेएमचे एक्झिक्युटिव्ह व्हाइस प्रेसिडेंट व डायरेक्टर–मॅन्युफॅक्चरिंग, श्री बी. पद्मनाभा म्हणाले, टीकेएममध्ये पर्यावरण संवर्धन ही केवळ कॉर्पोरेट धोरणाचा भाग नसून, ती आमच्या कामकाजात खोलवर रुजलेली मूल्य आहे. पर्यावरण महिना हा केवळ कॅलेंडरवर येणारा कार्यक्रम नसून, आपल्या मूल्यसाखळीतील प्रत्येक व्यक्तीला हरित भविष्यासाठी कृती करण्यास प्रवृत्त करणारे आवाहन आहे. 'झिरो–बेस थिंकिंग' आम्हाला केवळ लहान सुधारणा न करता कायमस्वरूपी प्रभाव निर्माण करणारे परिवर्तनात्मक उपाय स्वीकारण्यास प्रवृत्त करते. प्रत्येक उपक्रम केवळ भागधारकांना सहभागी करून घेत नाही तर शाश्वत जीवनशैली आणि हरित नवकल्पनांची सखोल समज पुरवतो.

एन्व्हायर्नमेंट मंथ २०२५ टीकेएम सस्टेनेबल हब २०२५ या व्यासपीठाद्वारे साजरा केला जाणार आहे, जो शिक्षण, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि सहभागात्मक उपक्रमांवर आधारित आहे. या महिन्यात दर आठवड्याला खालीलप्रमाणे विविध सस्टेनेबल स्टॉल्स लावले जाणार आहेत:

■ **ग्रीन एक्स्पो** – टोयोटा टेक्निकल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (टीटीटीआय) चे विद्यार्थी पर्यावरणीय प्रमुख घटकांवर आधारित मॉडेल्स सादर करतील

■ **वेल्थ फ्रॉम वेस्ट** – शालेय विद्यार्थ्यांद्वारे कचऱ्यापासून नवकल्पक वस्तू तयार करण्याचा सर्जनशील उपक्रम

■ **ग्रीन एक्झिबिशन** – पर्यावरण पूरक जीवनशैलीतील वस्तू, दैनंदिन उपयोगी साहित्य यांचे प्रदर्शन करत प्रकाशझोतात आणणे

■ **टेक शो** – सौर स्टोव्ह, इलेक्ट्रिक सायकल्स यासारख्या शाश्वत ऊर्जा उपायांचे सादरीकरण

याव्यतिरिक्त, प्लास्टिकमुक्त भविष्याकरिता पुनर्वापर करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी, संसाधनांचा वापर कमी करण्यासाठी, वनीकरणाच्या प्रयत्नांना वाढविण्यासाठी आणि बरेच काही करण्यासाठी विविध इको उपक्रम राबविले जात आहेत. प्रत्येक उपक्रम पर्यावरणीय जबाबदारीसाठी व्यापक वचनबद्धता दर्शवतो.

■ **प्लास्टिक पॅकेजिंग निर्मूलन** : २०३० पर्यंत प्लास्टिक पॅकेजिंग पूर्णतः बंद करणे(पर्यायी पॅकेज उपायांना प्रोत्साहन देणे) हे ध्येय असून, तत्काळ उद्दिष्टांमध्ये पार्ट्स पॅकेजिंगमध्ये ५% कपात, तसेच जुलै २०२५ पर्यंत प्लास्टिक बाटल्या, कव्हर्स, कटलरी पूर्णपणे बंद करणे यांचा समावेश

■ **सर्क्युलर इकॉनॉमीचा प्रसार** : (अपसायकल्ड प्रोडक्टस) कचऱ्यातून तयार केलेले वस्त्र, पेपर, टिश्यू, बॅग्ज इ. सादर करणे

■ **कार्बन व संसाधन वापर कपात लक्ष्य:** 'प्लांट झिरो कार्बन डायऑक्ससाईड बाय २०३०' हे ध्येय साध्य करण्यासाठी कार्बन डायऑक्ससाईड, पाण्याचा वापर, कचरा आणि कागदाचा वापर कमी करण्यासाठी सुधारणा उपक्रम (कैझेन) राबवणे

■ **हरित आवरण व वनीकरण** : जैवविविधता आणि परिसंस्थेच्या पुनर्संचयनाला पाठिंबा देण्यासाठी ढघच् परिसर आणि भागीदार ठिकाणी रोपे वितरण आणि वृक्षारोपण मोहीम

■ **समुदाय सहभाग** : पर्यावरण विषयक जागरूकता वाढवण्यासाठी आणि हरित विचारसरणी निर्माण करण्यासाठी टीकेएमकडून आयटीआय कॉलेज, सरकारी शाळा आणि स्थानिक समुदायांपर्यंत पोहोच वाढवली जात आहे. तसेच, सहभाग आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी, टीकेएमकडून पर्यावरणपूरक कार्यात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्ती आणि टीम्सना – कर्मचारी, पुरवठादार, डीलर आणि लॉजिस्टिक्स भागीदाररांना गौरविण्यात येणार आहे.

महिन्याच्या पुढील प्रवासात, टीकेएम कार्बन न्युट्रॅलिटी साध्य करणे, पर्यावरणीय प्रभाव कमी करणे आणि संपूर्ण कार्यपद्धतीत टिकावूपणाची संस्कृती रुजवणे यासाठी आपली कटिबद्धता पुन्हा अधोरेखित करत आहे. टोयोटाच्या रिस्पेफ्ट फॉर द प्लॅनेट या तत्वज्ञानाने मार्गदर्शित होऊन, हा उपक्रम दूरदृष्टी असलेल्या उपाययोजनांद्वारे आणि अर्थपूर्ण सहकार्याद्वारे दृष्टीकोनाला कृतीत रूपांतरित करतो, जे दीर्घकालीन पर्यावरणीय जबाबदारीसाठी प्रेरणा देतात.



# अनुदान योजनेच्या लाभापासून वयोवृद्ध 'निराधार'

### दोन महिण्यापासून तहसील कार्यालयात हेलपाटे मारुनही समाधानकारक उत्तर मिळत नसल्याने नाराज

**पाथर्डी । वीरभूमी-**
लाडकी बहीण योजनेमुळे श्रावण बाळ योजना, संजय गांधी निराधार योजनेसह अन्य योजनांच्या अनुदान वाटपात विस्कळीतपणा येऊन कागदपत्रांची पडताळणी, करत अनुदान कधी मिळेल याचा चौकशीसाठी दररोज तहसील कार्यालयात ग्रामीण भागातून अनेक गरजू येऊन तासंतास ताटकळत बसत चौकशी करतात. काही लाभार्थी तर दोन दोन महिने हेलपाटे मारूनही समाधानकारक माहिती त्यांना मिळत नसल्याची तक्रार आहे.

तहसील कार्यालयात संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, वृद्ध भूमीहीन योजना, अशा विविध योजनांचे मिळून १२१८६ लाभार्थी आहेत. यातील काही लाभार्थ्यांना सहा ते आठ महिन्यांपासून अनुदान मिळालेली नाही. त्यातच अनेक दिवसांपासून बैठक नसल्याने नव्या लाभार्थ्यांची निवड प्रलंबित आहे. काही लाभार्थी बँकेत जातात. तेथे त्यांना तहसील मध्ये चौकशी करा. अजून अनुदान जमा नाही. असे उत्तर मिळते. तहसील कार्यालयात पडताळणी करण्याचा नंबर येण्यासाठी किमान दोन तास प्रतीक्षा करावी लागते. बहुसंख्य लाभार्थी वृद्ध, व्याधीग्रस्त अशिक्षित असून नव्याने सुरू करण्यात आलेली कार्यप्रणाली त्यांना समजत नाही. कार्यालयात बऱ्याच वेळा सर्वर डाऊन, कधी रेंज नसते, तर कधी नेट स्लो असते. त्यामुळे प्रतीक्षा कालावधी वाढतो. अन्न पाण्यावाचून लाभार्थी वरांड्यात बसून असतात. उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून एका लाभार्थ्याची माहिती घेऊन चर्चा करत संगणकावर पडताळणी करायला किमान दहा मिनिटे लागतात. तोपर्यंत ताटकळलेले व तहान भुकेने व्याकुळ झालेले लाभार्थी कर्मचाऱ्यांचे टेबल भोवती गर्दी गोंधळ करतात. त्यांना बाहेर काढायला एक कर्मचारी अडकून पडतो. आज दुपारी तेथे भेट दिली असता व्हरांड्यात लाभार्थी महिला त्यातही अनेक ज्येष्ठ महिला रांगेत बसून होत्या. काही जणी झोपल्या, तर काही महिला नंबरच्या जागेवर पिशवी किंवा चपला ठेवून पिण्याच्या पाण्यासाठी बाहेर गेल्या होत्या. आज तेथील कर्मचाऱ्यांनी टोकन पद्धती सुरू करून क्रमांकानुसार लाभार्थ्याला दालनात प्रवेश सुरू केल्याने कामाची गती वाढली. याबाबत माहिती देताना नायब तहसीलदार दिग्विजय पाटील म्हणाले, अनेक लाभार्थ्यांचे अजून पर्यंत आधार लिंकिंग केवायसी पूर्ण झाले नाही त्यांनी तहसील कार्यालयात येऊन अपडेट झालेले आधार कार्ड, हयातीचा दाखला देऊन प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी. त्यानंतर तहसील कार्यालयात येऊन अपडेट झालेले आधार कार्ड, हयातीचा दाखला देऊन तेथील प्रक्रिया पूर्ण करून घेऊन बँकेत जाऊन आधार लिंकिंग करून घेतल्यावरच पैसे खात्यावर मिळू शकतील. कोणतीही अपूर्णता असेल तर अनुदान मिळण्यास अडथळा होतो. काही लाभार्थ्यांचे एकापेक्षा जास्त बँकेमध्ये खाते आहेत. त्यापैकी ज्या खात्यावर आधार मॅपिंग झाले असेल त्याच खात्यावर पैसे जमा होतील. लाभार्थ्यांनी सर्व खात्यांची पडताळणी करून घ्यावी. बँकेत आधार लिंकिंग व महसूल विभागात केवायसी या बाबी



त्वरित पूर्ण करून घ्याव्यात त्यामुळे वेळेवर लाभ मिळण्यास अडथळे राहणार नाहीत. चौकशीसाठी येणारे लाभार्थी कार्यपद्धती समजून न घेता थांबून राहत असल्याने गर्दी होते, असे पाटील म्हणाले.

दरम्यान लाभार्थ्यांच्या कुटुंबीयांच्या म्हणण्याप्रमाणे महसूल मंडल निहाय तलाठी, मंडलाधिकारी कार्यालयात संबंधित विभागातील लाभार्थ्यांचे काम झाल्यास गरजूंना हेलपाटे मारावी लागणार नाहीत. बहुसंख्य लाभार्थी ज्येष्ठ, वयोवृद्ध आहेत. घरी त्यांना समजावून सांगितले तरी ते ऐकण्याच्या मनस्थितीत नसतात. आपले पैसे बंद झाले या भीतीने त्यांची रात्रीची झोप उडाली आहे. त्यामुळे तहसील कार्यालयात जाण्याची त्यांची तळमळ व धावपळ बघता आम्ही त्यांना सकाळी कार्यालयात सोडून येतो व दुपारी पुन्हा घेऊन जातो. जिवंतपणीच जिवंतपणाचा दाखला म्हणजे हयातीचा दाखला मिळवण्यासाठी मरण यातना कमी करण्यासाठी मंडलाधिकारी पातळीवर जुन्या दाखल्यावरच नूतनीकरण व्हावे. म्हणजे प्रक्रिया सुरळीत होईल व लाभार्थ्यांचा व्यर्थ खर्च वाचेल. बस भाडे व अन्य खर्च यातच आम्ही मेटाकुटीला आलो आहोत. लाभार्थ्यांच्या म्हणण्याप्रमाणे सुविधा देण्यात साधनसामग्रीची अडचण असल्याचे आम्हाला सांगण्यात येते असे कुटुंबीयांचे म्हणणे आहे .

## SPOT NEWS

### रिपाईची शहरात तिरंगा सन्मान यात्रा उत्साहात

**अहिल्यानगर । वीरभूमी-**
शहरात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आठवले) वतीने ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर भारतीय सेनेच्या शौर्याच्या सन्मानार्थ तिरंगा सन्मान यात्रा काढण्यात आली. मार्केटयार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन तिरंगा सन्मान यात्रेचा प्रारंभ करण्यात आला. मार्केटयार्ड परिसरातून रॅलीचे मार्गक्रमण झाले. यावेळी भारत माता की जय..., भारत जिंदाबाद... पाकिस्तान मुर्दाबाद!, वंदे मातरम...च्या घोषणांनी परिसर दणाणला. केंद्रीय मंत्री ना. रामदासजी आठवले व जिल्हा संपर्कप्रमुख श्रीकांत भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांच्या नेतृत्वाखाली या तिरंगा सन्मान यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. हातात तिरंगा झेंडे घेऊन रिपाईचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला व बौध्द भिक्खू रॅलीत सहभागी झाले होते. याप्रसंगी रिपाईचे शहर जिल्हाध्यक्ष किरण दाभाडे, जिल्हाध्यक्ष सुनील साळवे, शहर जिल्हाध्यक्ष किरण दाभाडे, पूज्य भनतेजी संजय कांबळे, जिल्हा सरचिटणीस विजयराव भांबळ, गणेश कदम, शिवाजीराव साळवे, राजा जगताप, कविता नेटके, माया जाधव, अमित काळे, बाळासाहेब नेटके, बापू जावळे, अविनाश घोडके, काळू ससाने, शितल घोडके, रोहित कांबळे, निखिल सूर्यवंशी, योगेश घोडके, पप्पू जगताप, उत्कर्ष भालेराव, आदर्श साळवे आदी उपस्थित होते. सुनील साळवे म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून आपल्या भारतीय सैन्याने दहशतवाद्यांना कठोरपणे उत्तर दिले आहे, ज्याचा अभिमान प्रत्येक भारतीयाला आहे. भारतीय सैनिकांनी दहशतवादी आणि त्याला पोसणाऱ्या पाकिस्तानला ऑपरेशन सिंदूर च्या माध्यमातून चांगलाच धडा शिकवला. भारतीय सैनिकांचे बलिदान आणि त्यांचा पराक्रम देशाच्या बळकटीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. सर्व रिपाईचे कार्यकर्ते त्यांच्या शौर्याचा सन्मान करण्यासाठी एकत्र आले असल्याचे त्यांनी सांगितले. अतिशय उत्साहवर्धक व देशभक्तीने प्रेरित अशा वातावरणात ही यात्रा संपन्न झाली.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पारनेरमध्ये वृक्षारोपण

**पारनेर । वीरभूमी-**
पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण व त्याचे संवर्धन फार महत्त्वाचे आहे म्हणून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, पारनेर नगरपंचायत व सामाजिक वनीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी वसुंधरा जतन आणि संवर्धन करण्यासाठी सामुदायिक प्रतिज्ञा घेण्यात आली.

पारनेर नगरपंचायतीच्या तराळवाडी येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पात ५० विविध फळांची व भारतीय प्रजातींच्या झाडांची उपस्थितांच्या हस्ते लागवड करण्यात आली. यावेळी नगरपंचायत मुख्याधिकारी विनय शिपाई, नगराध्यक्ष नितीन अडसूळ, पाणी पुरवठा सभापती योगेश मते, डिजिटल मिडियाचे जिल्हाध्यक्ष विनोद गायकवाड, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे उपाध्यक्ष श्रीनिवास शिंदे, सचिव लतिफ राजे, पारनेर शहराध्यक्ष भगवान गायकवाड, युवा नेते अर्जुनशेठ भालेकर, उद्योजक राजू शेख, नगरसेवक भूषण शेलार, अशोक चेडे, सचिन औटी, अंतर्गत लेखापाल आम्रपाली जाधव, कल्पना शिंदे, राजश्री घोडके, शंकर गोरे, सामाजिक वनीकरण विभागाचे प्रशांत फुलोरे, लखन शिंदे, रिंकू इरोळे, बाबासाहेब गिरी, बाळासाहेब शेटे, अनिकेत देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.



> पारनेर नगरपंचायत अंतर्गत यावर्षी २५०० झाडांची लागवड करण्यात येणार आहे. मागील वर्षी हरित पट्टा अंतर्गत सोबलेवाडी येथे लागवड केलेल्या शेकडो रोपांचे चांगल्या प्रकारे संवर्धन करण्यात आले आहे. तसेच सामाजिक वनीकरण विभागाच्या सहाय्याने मियावाकी अंतर्गत पारनेर येथील गायरान जागेवर औषधी वनस्पतींची लागवड व संवर्धन करण्यात येणार आहे. अशा प्रकारे माझी वसुंधरा अभियानांतर्गत पारनेर नगरपंचायत हद्दीमध्ये वर्षभर विविध पर्यावरणीय उपक्रम घेतले जाणार आहेत.
> – **विनय शिपाई**, मुख्याधिकारी, नगरपंचायत पारनेर

नगराध्यक्ष नितीन अडसूळ म्हणाले की, वृक्षारोपण व संवर्धन काळाची गरज आहे. कारण भूतकाळातील झालेल्या पर्यावरणीय चुकांमुळे विविध पर्यावरणीय संकटांना तोंड देण्याची वेळ मानवावर आलेली आहे. यावेळी सृष्टीमित्र लतिफ राजे यांनी उपस्थितांना माझी वसुंधरा अंतर्गत पर्यावरण जतन व संवर्धनाची शपथ दिली. तसेच पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण व संवर्धन याची माहिती दिली.

# श्रीगोंद्याच्या स्काऊट्सनी पटकवला राज्य पुरस्कार

**श्रीगोंदा । वीरभूमी-**
येथील रयत शिक्षण संस्थेच्या महादजी शिंदे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्काऊट पथकातील ११ विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय चाचणी शिबिरात उत्कृष्ट कामगिरी करत राज्य पुरस्कार प्राप्त केला. या यशस्वी विद्यार्थ्यांना महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान केले जाणार आहे.



पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांना एस.एस.सी. परीक्षेत वाढीव गुण मिळाल्याने त्यांच्या टक्केवारीत वाढ होण्यास मदत होणार आहे. याशिवाय, हे स्काऊट्स नोव्हेंबर २०२५ मध्ये प्रयागराज येथे होणाऱ्या राष्ट्रीय जांबोरीत सहभागी होणार आहेत. महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट्स आणि गाइड्स यांच्या वतीने १६ ते १९ जानेवारी २०२५ दरम्यान पुण्यातील रामबाग, भोर येथील राज्य प्रशिक्षण केंद्रात आयोजित राज्यस्तरीय चाचणी शिबिरात पुणे विभागातील ४०० स्काऊट्स सहभागी झाले होते. या शिबिरात लेखी, तोंडी आणि प्रात्यक्षिक चाचण्यांमध्ये श्रीगोंद्याच्या स्काऊट्सनी प्रावीण्य मिळवले. कॅम्प क्राफ्ट, स्वयंपाक स्पर्धा आणि शेकोटी कार्यक्रमात विद्यालयाच्या पथकाने प्रथम क्रमांक पटकावला.

राज्य पुरस्कार प्राप्त करणाऱ्या स्काऊट्समध्ये आर्यन वाल्मिक आवचर, शिवम मनोहर माने, आर्यन दिपक जगताप, तोहिद असलम पठाण, सिद्धार्थ शांताराम थोरात, प्रतीक कैलास जगताप, अमित संजय खेडकर, सम्राट शरद घोडके, आदित्य दिगांबर गुंजाळ आणि जैद आरिफ जकाते यांचा समावेश आहे.

या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य राहुल जगताप, माजी मंत्री बबनराव पाचपुते, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, जनरल बॉडी सदस्य बाजीराव कोरडे, उत्तर विभागीय सल्लागार समिती सदस्य सुधीर खेडकर, अहिल्यानगर भारत स्काऊट्स आणि गाइड्सचे जिल्हा संघटक अरुण पेशकार, जिल्हा संघटक सोनाक्षी तेलंगे, तसेच शाळा समिती आणि शाळा व्यवस्थापन समिती यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

विद्यार्थ्यांना प्राचार्य दिलीप भुजबळ, उपमुख्याध्यापक शहाजी एकाड आणि पर्यवेक्षिका सुनिता काकडे यांचे मार्गदर्शन लाभले. स्काऊट मास्टर विकास लोखंडे आणि सचिन झगडे यांनी पथकाची नियोजनपूर्ण तयारी केली. या यशामुळे परिसरात आणि पालकांकडून विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

# शिवकालीन पर्यावरण नीतीचे अनुकरण करण्याची गरज : सुखदेव फुलारी

**नेवासा । वीरभूमी-**
शिवरायांनी हवामानाचा लहरीपणा लक्षात घेऊन जलव्यवस्थापन करण्यावर भर दिला. झाडांची कत्तल म्हणजे प्रजेला पीडा देणे होय, असे छत्रपती शिवाजीराजांचे मत होते. आपल्या लेकरा प्रमाणे झाडांना सांभाळा, त्यांना पीडा देऊ नका, त्यांची लागवड करा, असे विचार शिवाजीराजांनी दिले. पर्यावरणाचे रक्षण करणे, हे आपले कर्तव्य आहे ही त्यांची भूमिका होती. आजच्या काळात शिवकालीन पर्यावरण नीतीचे अनुकरण करण्याची गरज आहे असे प्रतिपादन जलमित्र सुखदेव फुलारी यांनी केले.

नेवासा तालुक्यातील भेंडा येथील श्री. मारुतरावजी घुले पाटील शिक्षण संस्थेच्या जिजामाता औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत संस्थेचे विश्वस्त माजी आ. पांडुरंग अभंग यांचे प्रमुख उपस्थितीत व विश्वस्त काशिनाथ नवले यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या ३५२ व्या शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रमात पर्यावरण संरक्षण याविषयावर प्रमुख व्याख्याते म्हणून श्री. फुलारी बोलत होते.

प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शिवाजी महाराज व लोकनेते मारुतराव घुले पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. जलमित्र श्री.फुलारी पुढे म्हणाले की, राजमाता जिजाऊंच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराजांनी मृदा संधारण, जलव्यवस्थापन, वृक्षसंवर्धन यावर मोठे काम केले. सोन्याचा नांगर हाकून नापीक जमीन उपजाऊ केली. शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी, बियाणे, औजारे देऊन शेती उत्पन्न वाढीस मदत केली. गडावरील शिबंदीला वर्षभर पाणी कसे पुरेल याचे नियोजन चोख करून किल्ले बांधले. गडावर डोंगराच्या पोटात खोदलेली टाकी, तळी पाहिली की लक्षात येते महाराजांचे जलव्यवस्थापन आणि दूरदृष्टीकोन किती प्रचंड होता. महाराजांच्या राज्यभिषेकाला रायगडावर एक लाखाहून अधिक पाहूणे आले होते. या महान समारंभातील सर्व लोकांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था या गडावरील पाणवठ्यावर केली होती. तरीसुध्दा पाण्याचा मुबलक साठा शिल्लक होता.



शिवकाळातही दुष्काळी परिस्थिती होती. शिवरायांनी हवामानाचा लहरीपणा लक्षात घेऊन जलव्यवस्थापन करण्यावर भर दिला. गडावर आधी पाणी पाहून किल्ला बांधावा, पाणी नाही आणि परंतु तेथे किल्ला बांधणे आवश्यक तेथे आधी खडक फोडून तळी-टाकी बांधून संपूर्ण गडाला पाणी पुरेल अशी मजबूत व्यवस्था करावी, गडाचे पाणी जतन करावे.' पाणी बचतीचाही संदेश शिवरायांनी दिला. महाराजांनी आपल्या आज्ञापत्रात वृक्षतोड थांबविण्याचा संदेश दिलेला आहे. त्यामुळेच आजच्या काळात ही शिवकालीन पर्यावरण नीतीचे अनुकरण करणे गरजेचे आहे.

झाड सावली, फळ, लाकूड, ऑक्सिजन, पक्षांना निवारा देते त्याचबरोबर जमिनीची धूप थांबवते, जल पुनर्भरण करते, त्यामुळे शिवराज्याभिषेक दिनाच्या निमिताने प्रत्येकाने एक तरी झाड लावण्याचा संकल्प करावा असे आवाहन श्री.फुलारी यांनी केले.

यावेळी निदेशक आप्पासाहेब गादे, उद्धव मडके, युनूस शेख, संजय उगले, अर्जुन आव्हाड, सुनिल निंबाळकर, शंकर म्हस्के, दिलीप गुजर, अजिनाथ माळी, सचिन भोसले, जालिंदर जाधव, देविदास देवढे, प्रविण मिसाळ, योगेश गायकवाड यांचेसह विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

आयटीआयचे गट निदेशक कोंडीराम मडके यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन चांगदेव लोढे यांनी केले तर संजय वाबळे यांनी आभार मानले.

# महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांनीचा सत्कार

**नगर । वीरभूमी-**
केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयाचा इयत्ता दहावी बोर्डाच्या परीक्षेचा १०० टक्के निकाल लागला. २१ वर्षांपासूनची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवून विद्यालयातील ११८ मुली विशेष प्राविण्याने व ७० मुली प्रथम श्रेणीत तर १५ द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाल्या. गौरी संतोषकुमार काळे हिने ९७ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम येण्याचा मान मिळवला. रिया प्रविण बोरा व वैष्णवी संतोष औशिकर या दोघींनी ९६.८० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकाविला. प्रणाली आदिनाथ शिंदे ९५.४० गुण घेवून तिसरी आली.

तसेच शाळेचा इयत्ता १२ वीचा निकाल देखील १०० टक्के लागला आहे. विद्यालयाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेचे सचिव बबनराव कोतकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्राचार्या वासंती धुमाळ, सखाराम गारुडकर, बबन साळवे, संजय निक्रड, राजेश सोनवणे,जालिंदर सातपुते, नामदेव वायळ, छाया सुंबे, जयश्री कोतकर, भारती गुंड, वनिता देवकर, राजश्री पालवे, समृद्धी लटके, देविदास हारवणे आणि प्राथमिक विभागाचे सर्व शिक्षकांचे व गुणवंत विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारती गुंड यांनी केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष रमेश गवळी, सचिव बबनराव कोतकर, सहसचिव रावसाहेब सातपुते, खजिनदार प्रल्हाद साठे, दगडू साळवे आदींसह सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

# ऐतिहासिक जलसंपत्तीच्या जतन योजनेत पुणतांबा गोदावरी घाटाचा समावेश

### विवेकभैय्या कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेल्या मागणीला यश

**कोपरगाव । वीरभूमी-**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त अहिल्यादेवींनी उभारलेल्या ऐतिहासिक जलसंपत्तींच्या जतनासाठी एक महत्त्वपूर्ण आणि लोककल्याणकारी निर्णय नुकताच घेण्यात आला आहे. दिनांक ६ मे २०२५ रोजी मौजे चौंडी (ता. जामखेड) येथे मंत्री परिषदेच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत अहिल्यादेवींच्या कार्याचा गौरव राखण्यासाठी व ऐतिहासिक जलसंपत्तीचे जतन करण्याच्या दृष्टिकोनातून व्यापक योजना आखण्यात आली. यात पुणतांबा येथील गोदावरी घाटाचा समावेश झाल्याने यापूर्वीच सहकार महर्षी कोल्हे कारखाना अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे विविध देवस्थान आणि तीर्थक्षेत्र विकास नाशिक येथे होणारा सिंहस्थ कुंभमेळा पार्श्वभूमीवर व्हावा अशी मागणी केलेली होती त्यातील पुणतांबा येथील मागणी पूर्ण होत असल्याने मुख्यमंत्री व शासनाने त्यांनी आभार व्यक्त केले आहे.

या निर्णयाअंतर्गत राज्यभरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी उभारलेले तलाव, विहिरी/बारव, कुंड, घाट यांची दुरुस्ती, गाळ काढणे, पुनरुज्जीवन व सुशोभीकरण करण्याच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे. या कामांची अंमलबजावणी मृद व जलसंधारण विभागामार्फत केली जाणार असून सध्या प्राथमिक संकलनात ३ तलाव, १९ विहिरी/बारव, ६ कुंड व ६ घाट अशा एकूण ३४ जलस्रोतांचा समावेश करण्यात आला आहे.

विशेष बाब म्हणजे या योजनेत कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील पुणतांबा येथील गोदावरी नदीवरील ऐतिहासिक घाटाचा समावेश करण्यात आलेला आहे. या निर्णयामुळे पुणतांबा येथील घाटाचे जतन, दुरुस्ती आणि सुशोभीकरण करून भाविक व पर्यटकांसाठी अधिक सुविधा निर्माण होतील.याबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आणि शासनाचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. सिंहस्थ कुंभमेळा नाशिक येथे होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी मुख्यमंत्री महोदयांकडे विविध तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी विशेष प्रयत्नांची मागणी केली होती. त्यातूनच कोपरगाव मतदारसंघातील पुणतांबा गोदावरी घाटाचा समावेश झाल्याने हा निर्णय अत्यंत स्वागतार्ह व जनतेच्या भावना जपणारा ठरला आहे, असे मत विवेकभैय्या कोल्हे यांनी व्यक्त केले.

ही योजना पुण्यश्लोक अहिल्यादेवींना अभिवादन करत त्यांच्या ऐतिहासिक वारशाचे जतन करणारी असून ती भावी पिढ्यांसाठी अमूल्य ठरेल, व होऊ घातलेल्या कुंभमेळ्यासाठी हा निर्णय अतिशय मोलाचा आहे असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यासह चासनळी, मंजूर, कुंभारी, कोपरगाव शहरील विविध देवस्थाने, संवत्सर, कोकमठाण यासह ३० ते ३५ गावांना गोदावरी तीर लाभला आहे त्यामुळे ऐतिहासिक महत्व असणाऱ्या कोपरगाव मतदारसंघातील इतरही देवस्थानांना लवकरच या प्रकारचा निर्णय सरकार घेईल अशीही मागणी केलेली आहे तिलाही लवकरच यश मिळेल अशी अपेक्षा विवेकभैय्या कोल्हे यांनी व्यक्त केली आहे.



वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# पारनेरचा चेतन रेपाळे ठरला देवाभाऊ केसरी कुस्ती स्पर्धेचा विजेता

## शेवटच्या क्षणी २ गुणांची कमाई करुन विजय संपादन । कौतुक डफडे ठरला उपविजेता

**शेवगाव । वीरभूमी–**
शेवगाव येथे अहिल्यानगर जिल्हा तालीम संघ, शेवगाव तालुका तालीम संघ आणि वंदे मातरम क्रीडा व सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या देवाभाऊ केसरी कुस्ती स्पर्धे चे विजेतेपद पारनेर येथील कुस्तीपटू चेतन रेपाळे याने दोन गुणांनी विजय संपादन केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्या मल्लास चांदीची गदा व रोख बक्षीस देण्यात आले.

खुल्या गटातील अंतिम सामना चेतन रेपाळे (पारनेर) विरुध्द कौतुक डफडे (पुणे) यांच्यात अत्यंत चुरशीचा झाला. तोडीस तोड बलदंड मल्ल एकमेकांना भिडले होते. सहा मिनीटाच्या कुस्तीत पहिल्या तीन मिनीटाच्या राऊंडमध्ये कौतुक डफडेने १ गुणांची कमाई करुन आघाडी घेतली. दुसऱ्या राऊंडमध्ये चेतन रेपाळे याने आक्रमक खेळी करुन २ गुणांची कमाई केली. शेवटच्या दीड मिनीटात दोन्ही मल्लांनी २–२ गुणांची बरोबरी साधली. पुन्हा रेपाळे याने २ गुण मिळवून आघाडी घेतली. ५० सेकंद असताना डफडे याने २ गुण घेऊन ४–४ ची पुन्हा बरोबरी साधली. ४० सेकंद असताना रेपाळे याने १ व शेवटच्या १५ सेकंदात पुन्हा २ गुणांची आघाडी घेऊन ५–७ गुणांनी विजय संपादन केला.

निमंत्रित कुस्त्यांमध्ये स्पर्धेचे खास आकर्षण ठरलेल्या महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील विरुद्ध महाराष्ट्र केसरी हर्षद सदगीर यांच्यात १.५ लाख रुपयांची व महिला विभागात नॅशनल मेडलिस्ट उषा कुमारी विरुद्ध नॅशनल मेडलिस्ट सोनाली मंडलिक यांच्यात एक लाख रुपयांवर निमंत्रित कुस्ती लावण्यात आली. दोन्ही कुस्त्या अत्यंत अटातटीच्या व रंगदार झाल्या. यामध्ये हर्षद सदगीर आणि सोनाली मंडलिक यांनी प्रतिस्पर्धी मल्लाला चितपट करुन विजय संपादन केले. तसेच शिवराज राक्षे याने देखील उत्कृष्ट खेळी करुन विजय मिळवला.

उपस्थितांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीसे देण्यात आली. तर देवाभाऊ केसरी कुस्ती स्पर्धे चा विजेता चेतन रेपाळे याला कै. छबु पैलवान लांडगे यांच्या स्मरणार्थ चांदीची गदा देण्यात आली. यावेळी स्पर्धेचे आयोजक अरुण मुंढे, जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष पै. वैभव लांडगे, खजिनदार पै. नाना डोंगरे, नंदू मुंढे, फारुक पटेल, सुनीलभाऊ धोत्रे, पप्पू शिरसाठ, बापूराव चव्हाण, युवराज पठारे, विक्रम बारवकर, तुषार वैद्य, अमोल सागडे, डॉ. कृष्णा देहाडराय, एकनाथ कुसळकर, अंकुश कुसळकर, मगर कडू, कमलेश गांधी, दिगंबर काथवटे, माजी उपनगराध्यक्ष वजीर पठाण, विक्रम बारवकर, दिपक डावखर, रमेश दारकुंडे, विनोद मोहिते, सालार शेख, माऊली खेडकर, बाळासाहेब कोळगे, एकनाथ शिरसाठ, गणेश गर्जे, उदय मुंढे, सुनील जगताप, क्रीडा अधिकारी भाऊसाहेब वीर, माजी सैनिक विनोद शेळके, पप्पू केदार, अंकुश ढाकणे, सोमा मोहिते, अभी बडे, अंबू पहिलवान, प्रकाश चित्ते आदींसह संयोजन समितीचे सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्पर्धेते विविध वजन गटातील स्पर्धे चा निकाल पुढीलप्रमाणे : **४२ किलो वजन गट विजयी–** प्रणव गुंजाळ (संभाजीनगर), उपविजयी– ओंकार थोरात (बुऱ्हाणनगर), तृतीय– फैसल पठाण (संभाजीनगर). **४८ किलो वजन गट विजयी–** समर्थ शहापूरकर (माळवाडा), उपविजयी– विशाल कुल्लाळ (बुऱ्हाणनगर), तृतीय– अर्जुन जाधव (बुऱ्हाणनगर). **५२ किलो वजन गट विजयी–** पारस बिडगर (मांडवे), उपविजयी– शुभम परजने (बीड), तृतीय– देवानंद राऊत (जामखेड). **५५ किलो वजन गट विजयी–** जादू सतरकर (गेवराई), उपविजयी– सुरज जाधव (बुऱ्हाणनगर), तृतीय– प्रणव खंडागळे (पुणे). **६० किलो वजन गट विजयी–** शुभम लांडगे (वडगाव), उपविजयी– अविनाश गाडे (आष्टी), तृतीय– जयेश जाधव (मालेवाडी). **६५ किलो वजन गट विजयी–** शुभम जाधव (नेवासा) उपविजयी– सचिन मुरकुटे (कर्जत), तृतीय– ऋषिकेश उचाळे (शिरपूर). **७४ किलो**



**वजन गट विजयी–** सौरभ मराठे (कापूरवाडी), उपविजयी– तुषार खामकर (जामखेड), तृतीय– अभिषेक गहिराळे (बीड). **८४ किलो वजन गट विजयी–** महेश फुलमाळी (नेवासा), उपविजयी– ऋषिकेश शेळके (कर्जत), तृतीय– गणेश चव्हाण (कर्जत). **खुला गट देवाभाऊ केसरी विजेता–** चेतन रेपाळे (पारनेर), उपविजयी– कौतुक डफडे (पुणे), तृतीय– विजय पवार.

# अमृतवाहिनी आयटीआय मध्ये शिवराज्याभिषेक दिनानिमित्त पालकांचा सत्कार

**संगमनेर । वीरभूमी–**
तालुक्यातील अमृतवाहिनी आय.टी.आय. मध्ये शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सदर कार्यक्रमाचे ऑनलाइन उद्घाटन केले. या कार्यक्रमानिमित अमृतवाहिनी आय.टी.आय. मध्ये तंत्र प्रदर्शन भरवण्यात आले. सदर तंत्र प्रदर्शनाचे उद्घाटन अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे यांनी रिमोट द्वारे केले. या उद्घाटनासाठी संस्थेचे मॅनेजर व्ही. बी. धुमाळ, संस्थेचे अकॅडेमीक डायरेक्टर डॉ. जे. बी. गुरव, अमृतवाहिनी आय. टी. आय.चे प्राचार्य व्ही. व्ही. भाटे, अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजमधील सिव्हील विभागातील प्रा. चेतन कडलग, अमृतवाहिनी आय. टी. आयचे सर्व स्टाफ,



विद्यार्थी व पालक हजर होते. या कार्यक्रमानिमित आयटीआय मध्ये पालकांचा सत्कार करण्यात आला.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च गुणवत्तेचे शिक्षण मिळावे, यासाठी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी अमृतवाहिनी आय.टी. आय. ची स्थापना १९८४ साली केली. संस्थेने गुणवत्तेत सातत्य राखल्याने संस्थेचा नावलौकिक वाढला आहे. येथील शैक्षणिक वातावरण, निसर्ग सुंदर परिसर, शिस्त, स्वच्छता तसेच विद्यार्थ्यांना प्लेसमेंट व आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत.

यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. चेतन कडलग यांनी पर्यावरण व संरक्षण विषयावर व्याख्यान दिले. व्याख्यानात बोलताना छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ६ जून १६७४ रोजी झाला होता. आज त्या राज्याभिषेक सोहळ्यास ३५० वर्षे पूर्ण झालेली आहेत. या कार्यक्रमाचे औचित्य साधून कौशल्य विकास विभागाने संपूर्ण महाराष्ट्रातील शासकीय व अशासकीय आय.टी.आय. मध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम यशस्वी करण्यात आला आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन मोरे यांनी केले तर आभार प्राचार्य व्ही. व्ही. भाटे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व स्टाफ व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. तसेच अमृतवाहिनी आय. टी. आय. साकुर व आय. टी. आय. तळेगाव दिघे येथेही स्वतंत्र पणे शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# छत्रपती शिवाजी महाराज पर्यावरण संवर्धनाविषयी अत्यंत दक्ष होते : प्रा. संदेश कासार

**अकोले । वीरभूमी–**
छत्रपती शिवाजी महाराज हे पर्यावरण संवर्धनाविषयी अत्यंत दक्ष होते. त्यांनी आपल्या सैनिकांना रयतेने लावलेली वृक्ष संपदा कधीही तोडू नये अशी आज्ञा केली होती. यातून छत्रपती शिवाजी महाराज यांना रयतेची, रयतेच्या संपत्तीची असलेली काळजी दिसतेच. परंतु ते पर्यावरण संवर्धनाविषयी अत्यंत दक्ष असल्याचेही लक्षात येते, असे प्रतिपादन प्रा. संदेश कासार यांनी केले.

येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे आयोजित 'शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रम' प्रसंगी पर्यावरण संतुलन या विषयावर व्याख्यान देताना ते बोलत होते. राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाइन या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनिषा वर्मा (भा. प्र. से.) यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे कार्यक्रमाला सदिच्छा दिल्या. अध्यक्षस्थानी अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सुनील दातीर हे होते तर सेक्रेटरी सुधाकरराव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. मंचावर परफेक्ट इंग्लिश मिडीयम स्कूलच्या प्राचार्या सौ. मीना नवले, औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य अरुण भालेराव हे उपस्थित होते.

प्रा. कासार म्हणाले, मे महिन्यामध्ये अभूतपूर्व पाऊस महाराष्ट्राने अनुभवला. हा मॉन्सूनपूर्व पाऊस होता. अरबी समुद्र व बंगालचा उपसागर याठिकाणी तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे हा भयावह पाऊस पडला. शेतीचे, संपत्तीचे मोठे नुकसान या पावसाने झालेच परंतु जीवितहानीही मोठ्या प्रमाणावर झाली. हवामान बदलामुळे निर्माण झालेल्या विविध समस्यांचे एक उदाहरण म्हणजे हा पाऊस होय.' पर्यावरण ऱ्हासाची विविध कारणे, त्याचे दुष्परिणाम विविध उदाहरणांनी त्यांनी समजावून सांगितले. पर्यावरण संरक्षण व संवर्धन चळवळी, वैज्ञानिक पातळीवर सुरू असणारे पर्यावरण संवर्धनासाठीचे प्रयत्न यांची माहिती दिली. पर्यावरण संवर्धनामध्ये आपण कोणती भूमिका पार पाडू शकतो याविषयीही त्यांनी विवेचन केले.

अध्यक्ष सुनील दातीर यांनी अध्यक्षीय मनोगतातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याची महती सांगितली. शिवराज्याभिषेक सोहळ्याचा गौरवशाली इतिहासही त्यांनी कथन केला. 'परफेक्ट' च्या प्राचार्या सौ. मीना नवले यांनीही प्रदूषणाचे विविध प्रकार, प्रदूषणाचे आपल्या जीवनावर होणारे दुष्परिणाम व प्रदूषण कमी करण्यासाठी आपली भूमिका यावर मनोगत व्यक्त केले.

यावेळी हिवाळी क्रीडा स्पर्धेमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. आय. टी. आय. प्रवेशासाठी तयार करण्यात आलेला व्हिडिओही याप्रसंगी दाखविण्यात आला. दोन नाविन्यपूर्ण उपक्रमांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. आर. के. आरोटे सर यांनी सूत्रसंचलन केले व आभार हासे सर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी बी. जे. वैद्य, पी. बी. नवले, एन. जी. थटार, सागर मंडलिक, सतीश वैद्य, भारत धुमाळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मोहटादेवीच्या दर्शनाने प्रेरणादायी ऊर्जा व सकारात्मकता वाढवते

## अशोककुमार भिल्लारे । राज्याचे अभियोग संचालनालयाचे संचालकपदी नियुक्तीनंतर घेतले मोहटादेवीचे दर्शन

**पाथर्डी । वीरभूमी –**
श्रीक्षेत्र मोहटा देवीचे स्थान अत्यंत जागृत, निसर्ग रम्य परिसराने नटलेले असून येथील प्रेरणादायी ऊर्जा व सकारात्मकता वाढवते. राज्यातील प्रमुख देवस्थानांपैकी मोहटा देवस्थान नावारूपाला आले आहे, असे मत राज्याचे अभियोग संचालनालयाचे संचालक अशोक कुमार भिल्लारे यांनी व्यक्त केले.

संचालक पदावर नियुक्ती झाल्यानंतर प्रथमच भिल्लारे यांनी मोहटा देवस्थानला भेट दिली. यापूर्वी ते पाथर्डी येथे दिवाणी न्यायाधीश असताना देवस्थानचे विश्वस्त तर जिल्हा न्यायाधीश असताना अध्यक्षपदावर त्यांनी काम केले आहे.

यावेळी अस्मिता भिलारे, प्राचार्य डॉ. विलास भिलारे, यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे, देवस्थानचे पुरोहित बाळासाहेब क्षीरसागर आदींनी स्वागत केले. यावेळी भिल्लारे म्हणाले, राज्यातील साडेतीन शक्ती पिठांच्या बरोबरीने मोहटा देवस्थानचे महात्म्य वाढत असून राज्याच्या कानाकोपऱ्यातून येथे मोठ्या संख्येने भाविक येतात. शासनाच्या विविध विकास निधीतून विकासकामे वेगाने सुरू असून परिसराचे वातावरण व स्थान महात्म्य बघता गर्दी गोंगाटापासून दूर राहत आध्यात्मिक शक्तीची अनुभूती घेण्यासाठी येणाऱ्या काळात भाविकांचा ओढा येथे अधिक वाढणार आहे. देवस्थान समितीकडून विकास कामांबरोबरच भाविकांसाठी दैनंदिन सुविधा देण्यावर विशेष लक्ष दिले जात असल्याने भाविकांचेही समाधान होते. येथील स्थान महात्म्य मोठे असल्याने येणाऱ्या भाविकाला हमखास प्रचिती येते. धार्मिक व निसर्ग पर्यटनाच्या दृष्टीने अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रमुख तीर्थक्षेत्र आता राज्यातील प्रमुख तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. काही काळ आपल्याला येथील सेवा करण्याची संधी मिळाली. त्या काळातही विकास कामांना चांगली दिशा देता आली. भौतिक सुख सुविधांपलीकडे लोकांकडून मनःशांती, सकारात्मक ऊर्जा व निवांतपणा शोधला जातो.



मोहटा देवस्थान येथे अशा पद्धतीच्या वातावरणामुळे भाविकांचे मन अधिक प्रसन्न होते. माहूरच्या देवीचे स्वयंभू अंशात्मक स्थान म्हणून मोहटादेवीची ख्याती असल्याने देवी भक्तांमध्ये सुद्धा मोहटागडाचे आकर्षण वाढत आहे. देवस्थान समितीच्या प्रशासनाकडून सोयी सुविधा वाढवताना परिसराची मूळ रचना अबाधित ठेवूनच कामे व्हावीत, अशी अपेक्षा व्यक्त करत सर्व विकासकामांबाबत भिलारे यांनी समाधान व्यक्त केले.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय शहरा लगत करण्याची आपची मागणी

**नगर । वीरभूमी–**
आम आदमी पार्टीच्या वतीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अहिल्यानगर शहराच्या लगत करण्याची मागणी करुन शहराबाहेर वैद्यकीय महाविद्यालय करण्यास विरोध दर्शविण्यात आला आहे.

सदर मागणीसाठी आपचे शहराध्यक्ष भरत खाकाळ यांच्या नेतृत्वाखाली आपच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची भेट घेऊन निवेदन दिले. याप्रसंगी महिला आघाडी अध्यक्ष ड. विद्याताई शिंदे, महासचिव दिलीप घुले, कला-सांस्कृतिक आघाडी अध्यक्ष प्रकाश वडवणीकर, संघटक रवी सातपुते, सहसंघटक विक्रम क्षीरसागर, सचिव सचिन ऐकाडे, पर्यावरण आघाडी अध्यक्ष अजित कटारिया, उपाध्यक्ष अंबादास जाधव, युवा आघाडी अध्यक्ष विजय लोंढे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

नगर जिल्ह्यासाठी मंजूर झालेला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीसाठी आणि जिल्ह्याच्या सर्वांगीन विकासासाठी नगर शहरालगत सुरू झाले पाहिजे. शिर्डी येथे सदर महाविद्यालय स्थलांतर करण्याचे षडयंत्र सुरू असून, जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी म्हणून अहिल्यानगर शहर परिसरात हे महाविद्यालय उपयुक्त ठरणार आहे. यासाठी शहरालगत २५ ते ३० एकर जागाही उपलब्ध आहे. मुख्यमंत्री व संबंधित समितीला आपच्या माध्यमातून पत्रव्यवहार करण्यात आलेला असल्याचे म्हटले आहे.

# पर्यावरण संवर्धनाचा फक्त 'संकल्प नको तर प्रत्यक्ष कृती हवी'

## पोनि. संतोष मुटकुळे । बर्ड संस्थेच्या वतीने पाथर्डी शहरातून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सायकल रॅली

**पाथर्डी । वीरभूमी–**
निसर्गाने मानवाला सर्व काही देताना मुक्तहस्ताने व भरभरून दिले परंतु मानवाने स्वार्थाने वागत निसर्गाचा ऱ्हास लावला आहे. औद्योगीकरण, शहराचे विस्तारीकरण, व विकासाच्या नावाखाली जे निसर्गाचे नुकसान होऊन पर्यावरणाचा असमतोल निर्माण होत आहे याकडे आजच्या सुशिक्षित पिढीने डोळसपणे पाहणे गरजेचे आहे अन्यथा त्याचे भयावह परिणाम आगामी अनेक पिढ्यांना भोगावे लागतील. प्रत्येकाने पर्यावरण संरक्षणाचा फक्त संकल्प करू नये तर तो कृतीतून उतरावा. असे आवाहन पाथर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पाथर्डीकरांना केले.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भगवान इन्स्टिट्यूट ऑफ रुलर डेव्हलपमेंट (बर्ड ) संस्थेच्या वतीने शहरातून सायकल रॅली काढण्यात आली यावेळी या रॅलीत सहभागी होत श्री मुटकुळे यांनी रॅलीला व नागरिकांना मार्गर्शन करताना केले. संस्कार भवन येथून निघालेल्या या रॅली चा समारोप वृक्षारोपणाने वनदेव परिसरात झाला. रॅली दरम्यान विविध घोषणा देत व फलकाद्वारे नागरिकांचे लक्ष वेधून घेत पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

या सायकल रॅलीत डॉ. दिपक देशमुख, ॲड. हरिहर गर्जे, डॉ विनय फड, ॲड. दिनकर पालवे, उद्योजक अमृत चोपडा, राजेंद्र काळे, सामाजिक कार्यकर्ते सुखदेव मर्दाने, अरविंद सोनटक्के, बांगर सर, निऱ्हाळी सर आदींसह विद्यार्थी ही सहभागी झाले होते. पुढे बोलताना मुटकुळे म्हणाले की, वाहनाद्वारे होणारे प्रदुषण, तापमान वाढ,अवेळी येणारा पाऊस,वाढते वायु व जल प्रदुषण, प्लॅस्टीकचा वापर, वाढत जाणारे साथीचे आजार या सर्व समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चाललेल्या आहेत. या सर्व समस्या मानव निर्मित आहेत. यासाठी आपण आपल्या गाव पातळीवर व वैयक्तिक पातळीवर, समुहाने काही करू शकतो का ? याचा विचार व कृती करण्याची वेळ आलेली आहे. प्लास्टीकने पुर्णपणे आपला ताबा घेतलेला आहे.ही एक ग्लोबल समस्या बनलेली आहे. प्लास्टिक पिशवी (कॅरी बॅग) ऐवजी कापडी पिशवीचा वापर प्रत्येक नागरीकाने केला तर निश्चितच अनावश्यक प्लास्टिकचा वापर टाळला जाईल. जल वायू व ध्वनी प्रदूषणापासून पृथ्वीला वाचवायला हवे अन्यथा विनाश अटळ आहे. म्हणून प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून आपापल्या परीने निसर्गाचे संवर्धन करावे. डीजे सारख्या ध्वनी प्रदुषण करणाऱ्या गोष्टी टाळाव्यात. परिसरात स्वच्छता ठेवून जल प्रदूषण टाळावे, केमिकल युक्त पदार्थाचा वापर टाळावा, दुचाकी, चार चाकी वाहनांचा वापर अनावश्यक गोष्टीसाठी करू नये. सायकलचा जास्तीत जास्त व कायम वापर हा आरोग्यासाठीही उत्तम आहे. निसर्ग संवर्धनासाठी जनजागृती करून पुढील पिढीसाठी अनुकरनीय असे कार्य करावे.आपण सर्वांनी पर्यावरण संरक्षणाचा संकल्प करून



वर्षभर कृती केल्यास पाथर्डी शहर स्वच्छ सुंदर व हरीत होईल. यात शंका नाही. बर्ड संस्था मागील वीस-बावीस वर्षांपासून असे उपक्रम राबवित आहे हे कौतुकास्पद आहे.

सूत्रसंचालन सुखदेव मर्दाने यांनी तर आभार डॉ. दिपक देशमुख यांनी आभार मानले.